MHYA210014322024

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | ०५/०७/२०२४ |
| नोंदणी दिनांक | ०५/०७/२०२४ |
| निकाल दिनांक | ०४/०४/२०२६ |
| कालावधी | ०१ व. ०८ म. २९ दि. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, वणी, ता.वणी, जि.यवतमाळ**

(पिठासीन अधिकारी शहाजी दत्तराव भोसले)

(न्या.अ.सांकेतांक क्र.एम.एच.०२८७३)

**न्यायनिर्णय दि.०४/०४/२०२६**

**किरकोळ फौजदारी अर्ज क्र.४३/२०२४** **नि.क्र.१७**

**सौ. सोनाली प्रशांत काटकर,**
वय –३८ वर्ष, व्यवसाय–घरकाम,
रा.भिमनगर, वणी, ता. वणी, जि.यवतमाळ ......**अर्जदार**

**–विरुध्द –**

**प्रशांत रामदास काटकर,**
वय –४८ वर्ष, व्यवसाय– शेती,
रा. दहेगाव, ता.वणी, जि. यवतमाळ .. **गैरअर्जदार**

**फौजदारी प्रक्रीया संहीता कलम १२५ प्रमाणे पोटगी मिळणेकरीता**

.....................................................................................................

अर्जदारातर्फे विद्वान अधिवक्ता – श्री.एन.बी.चंदने,
गैरअर्जदारातर्फे – एकतर्फा.

.....................................................................................................

**न्या य नि र्ण य**

(दि.०४/०४/२०२६ रोजी घोषित)

प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम १२५ नुसार पोटगी मिळणेकरीता दाखल केला आहे. (यापुढे फौ.प्र.सं. संबोधण्यात येते).

**अर्जदाराचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे –**

२. अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असून उभयतांचा विवाह दि.१६/०५/२००७ रोजी बौद्ध विधीनुसार शेतकरी मंदिर, वणी ता.वणी जि.यवतमाळ येथे झाला. अर्जदार हिला गैरअर्जदारापासून अनिष्का ही मुलगी आहे. अर्जदार विवाहनंतर गैरअर्जदाराचे संयुक्त कुटुंबात नांदावयास गेली. गैरअर्जदाराने अर्जदारास सुरुवातीचे २ ते ३ वर्ष चांगली वागणूक दिली. त्यानंतर, गैरअर्जदार दारूचे नशेमध्ये संशय घेऊन अर्जदारास मारहाण करीत होता व कोणाशीही बोलू देत नव्हता. गैरअर्जदार हा अर्जदाराचे चारित्र्यावर संशय घेऊन तिचा शारीरिक व मानसिक छळ करू लागला. अर्जदाराचे सासू–सासरे सुद्धा गैरअर्जदाराचे कृत्यास प्रतिसाद देऊ लागले. त्या त्रासाला कंटाळून अर्जदार तिचे आई–वडीलांकडे माहेरी राहू लागली.

३. अर्जदाराने गैरअर्जदारास बरेचदा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याचा कोणताही उपयोग झाला नाही. सन २०१९ मध्ये गैरअर्जदाराने अर्जदारावर संशय घेवून तिला बेदम मारहाण करून मुलगी अनिष्कासह घराबाहेर काढले. तसेच, त्याने अर्जदारास नांदविण्याकरिता नकार दिला. त्यामुळे, अर्जदार नाइलाजास्तव तिचे आईवडीलांचे आश्रयाने राहत होती. त्यावेळी, अर्जदाराने गैरअर्जदार व त्याचे नातेवाईकांविरुद्ध कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरंक्षण कायद्यातंर्गत कलम १२ नुसार फौ.मा.क्र.२२/२०१९ हे प्रकरण दाखल केले. तो अर्ज मंजूर होऊन न्यायालयाने अर्जदाराला पोटगी मंजूर केली. परंतु, सदर मामला निकाली निघाल्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदारास मुलीसह नांदावयास नेले. त्यामुळे, अर्जदाराने गैरअर्जदाराविरुद्ध पोटगी वसूल करण्याकरिता कोणताही कार्यवाही केली नाही. परंतु, त्यानंतर गैरअर्जदाराचे वागणुकीत कोणताही बदल झाला नाही व त्याने अर्जदारास त्रास देणे चालू केले.

४. दि.०६/०३/२०२४ रोजी रात्री आठ वाजताचे गैरअर्जदाराने अर्जदारास लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तिचा गळा दाबून तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच तिला घराबाहेर हाकलून दिले. अर्जदाराने कशीबशी रात्र काढून दुसरे दिवशी भिमनगर, वणी येथे तिचा मैत्रीण वैष्णवी गढीवाल हिचेकडे आश्रय घेतला. तेव्हापासून

अर्जदार येथे राहत आहे. सदर घटनेबाबत अर्जदाराने पोलीस ठाणे, मुकुटबन येथे तक्रार दाखल केली. गैरअर्जदाराने अर्जदाराचा त्याग करून तिला एकाकी सोडून तिचेवर अन्याय केला आहे. तसेच गैरअर्जदार हा हिंसक प्रवृत्तीचे असून अर्जदाराचे जिवाचे बरेवाईट होण्याची शक्यता असल्याने तिचे गैरअर्जदारासोबत संसार करणे जोखमीचे आहे.

५. अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून तिला कोणतेही कला कौशल्य अवगत नाही. ती पूर्णपणे गैरअर्जदारावर अवलंबून आहे. याउलट, गैरअर्जदाराचे वडिलांचे नावाने मौजा घोन्सा, ता.वणी जि.यवतमाळ येथे सात एकर, मौजा गिरोली ता.सेलू जि.वर्धा येथे तीन एकर ओलीताची सुपीक शेतजमीन असुन मौज वलासा ता.झरी येथे सुद्धा शेती आहे. सदर शेतीमधून वार्षिक रु.७,००,०००/– उत्पन्न होते. तसेच त्याचेवर अर्जदार वगळता इतर कुणाचीही जबाबदारी नाही. गैरअर्जदाराचे आर्थिक उत्पन्न व सामाजिक आर्थिक स्थितीशी अनुरूप जीवन जगण्यासाठी अर्जदारास तिचे गरजा अन्न, वस्त्र, निवारा, इ. साठी दरमहा रु.१५,०००/– पोटगीची गरज आहे. गैरअर्जदार हा अर्जदारास पोटगी देण्यास सक्षम आहे. सबब, तिने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

६. गैरअर्जदारास समंस तामील होवुन देखील तो न्यायालयात हजर झाला नाही. त्यामुळे, सदरचे प्रकरण त्याचे विरुध्द एकतर्फा चालविण्यात आले.

७. प्रकरणातील वरीलप्रमाणे आलेल्या माहितीवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष पुढील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदाराने अर्जदाराचा कोणत्याही समर्थनिय कारणांशिवाय दुर्लक्ष करुन त्याग केला आहे काय ? | **.. होय.** |
| २ | अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे काय ? | **.. होय.** |

| | | |
|---|---|---|
| ३ | गैरअर्जदार हा अर्जदाराला स्वतंत्रपणे पोटगी देण्यास सक्षम आहे काय ? | ... **होय.** |
| ४ | अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे ती पोटगीची रक्कम मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **...होय, दरमहा रु.५,०००/-** |
| ५ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

८. अर्जदाराने तिचे म्हणणे सिध्द करण्यासाठी स्वतःचा पुरावा नि.क्र.१० नुसार दाखल केला. तसेच तिने गैरअर्जदाराचे वडिलांचे नावाने मौजा घोन्सा येथील शेत गट क्र.१०९ चा ७/१२ उतारा नि.क्र.१४ वर दाखल केला. अर्जदाराचे अधिवक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्जातील कथनांप्रमाणे आपला युक्तीवाद सादर केला.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता–**

९. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ नुसार एखादा व्यक्ती हा त्याचे पत्नी, लहान मुले व आई–वडील यांचे पालन पोषण योग्य त–हेने करत नसेल किंवा त्यांचा सबळ कारणाअभावी त्याग करत असेल आणि त्याचे पत्नी, लहान मुले व आई–वडील स्वतःचे पालणपोषण करण्यास समर्थ नसतील तर अशा परिस्थितीत त्या व्यक्तीची पत्नी, लहान मुले व आई–वडील यांना त्यांचे उदरनिर्वाहाचा खर्च त्या व्यक्तीकडुन मागता येतो. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने तिला गैरअर्जदाराकडुन पोटगी मिळण्याकरीता वरील बाबी सिध्द करणे गरजेचे आहे.

१०. अर्जदाराने तिचा पुरावा प्रतिज्ञालेख दाखल करुन त्यामध्ये अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. गैरअर्जदाराने न्यायालयात हजर राहुन अर्जदाराचा उलट तपास घेतला नाही. त्यामुळे, अर्जदाराचा पुरावा जशास तसा राहीला आहे. त्यावर संशय घेता येण्यासारखी कुठलीही बाब न्यायालयासमक्ष आली नाही. सबब, अभिलेखावर गैरअर्जदाराने अर्जदारास मारहाण करुन तिला शारिरीक व मानसिक त्रास दिला आणि अर्जदाराचा परित्याग करुन तिचे पालणपोषणाची कोणतीही व्यवस्था केली नाही, याबाबी

सिध्द होतात.

११. त्याचप्रमाणे अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असतांना तिला त्रास असल्याखेरीज ती न्यायालयासमक्ष पोटगी मागण्याकरीता येणार नाही. तसेच ती गैरअर्जदारावर कोणताही आरोप करणार नाही. त्याचप्रमाणे, कोणतीही भारतीय स्त्री सबळ कारणाअभावी आपल्या पतीस सोडुन राहणार नाही. सदर प्रकरण चालवितांना गैरअर्जदाराने अर्जदाराचे पालणपोषणासाठी कोणतीही तजवीज केल्याचे न्यायालयासमोर आले नाही. याचाअर्थ, गैरअर्जदाराने अर्जदाराचे पालणपोषणाकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे किंवा त्यास नकार दिला आहे. तसेच वर उल्लेख केल्याप्रमाणे अर्जदार ही गैरअर्जदाराचे शारिरीक व मानसिक त्रासाची बळी ठरल्याचे दिसुन येते. सबब, अर्जदाराला गैरअर्जदारापासुन वेगळे राहण्यास संयुक्तिक कारण घडल्याचे दिसुन येते. म्हणुन, गैरअर्जदाराने अर्जदाराला मानसिक व शारिरीक त्रास दिला व तिचा समर्थनिय कारणांअभावी त्याग केला, हे प्रथमदर्शनी सिध्द होते. म्हणुन मी, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.२ करीता–</u>**

१२. अर्जदाराचे पुराव्यावरुन असे दिसुन येते की, ती तिचे मैत्रीणीकडे राहत असुन ती तिचे पालणपोषण करण्यास असमर्थ आहे. त्याचप्रमाणे, अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच अभिलेखावर दाखल असलेले नि.क्र.१६ वरील मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रसुध्दा अर्जदाराचे उपरोक्त पुराव्याशी सुसंगत असल्याचे दिसुन येते. म्हणुन, अर्जदार ही स्वतःचे पालणपोषण करण्यास असमर्थ असल्याचे सिध्द होते. सबब, मी, मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.३ करीता–</u>**

१३. गैरअर्जदार हा अर्जदारास पोटगी देण्यास सक्षम आहे, हे सिध्द करणे अर्जदाराची जबाबदारी आहे. त्याकरीता अर्जदाराला गैरअर्जदाराचे उत्पन्नाबाबत योग्य ते पुरावे सादर करावे लागतील. अर्जदाराने गैरअर्जदाराचे वडिलांचे नावाने मौजा घोन्सा, ता.वणी जि.यवतमाळ येथे सात एकर, मौजा गिरोली ता.सेलू जि.वर्धा येथे तीन एकर ओलीताची सुपीक शेतजमीन असुन मौज वलासा ता.झरी येथे शेती असुन त्यातुन

वार्षिक रु.७,००,०००/– उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. परंतु, अर्जदाराने अभिलेखावर गैरअर्जदाराचे वडीलांचे केवळ मौजा घोन्सा येथील शेतगट क्र.१०९ चा ७/१२ उतारा नि.क्र.१४ वर दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते कि, गैरअर्जदाराचे वडिलांची मौजा घोन्सा येथे शेत गट क्र.१०९ क्षेत्रफळ २.८७ हे.आर. एवढी जिरायती शेतजमीन आहे. त्यामध्ये, गैरअर्जदाराचे हिस्सा आहे. त्यातून गैरअर्जदाराला अर्जदाराचे आवश्यक गरजा पुर्ण करण्याइतपत उत्पन्न नक्कीच मिळते. सबब, गैरअर्जदाराची आर्थीक परिस्थीती अर्जदाराचे मुलभुत गरजा पुर्ण करण्यायोग्य असल्याचे दिसुन येते. सबब, गैरअर्जदार हा अर्जदाराचे पालनपोषण करण्यास सक्षम असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, गैरअर्जदार हा अर्जदारास पोटगी देण्यास सक्षम असल्याचे सिध्द होते. म्हणुन मी मुद्दा क्र. ३ चे निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीता–</u>**

१४. अर्जदाराने तिला पोटगीसाठी दरमहा प्रत्येकी रु.१५,०००/– मिळण्याची प्रार्थना केली आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराचा समर्थनिय कारणांशिवाय दुर्लक्ष करुन त्याग केल्याची बाब अर्जदाराने सिध्द केली आहे. अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असुन त्यांचे नातेसंबंध आजही कायम आहेत. आजरोजी अर्जदार तिचे मैत्रीणकडे राहत आहे. त्यामुळे, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अशा परिस्थीतीमध्ये, गैरअर्जदाराने अर्जदाराचे पालनपोषण व उदरनिर्वाहाची व्यवस्था करणे, ही त्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे.

१५. अभिलेखावर गैरअर्जदाराचे वडिलांचे मौजा घोन्सा येथील गट क्र.१०९ चा ७/१२ उतारा दाखल आहे. परंतु, त्यामध्ये गैरअर्जदाराचा किता हिस्सा आहे व त्यापासुन त्यास किती उत्पन्न मिळते, याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा आला नाही. आजचे युगात २.८७ हे.आर. जिरायत शेतीपासुन खर्चवजा जाता वार्षिक रु.४०–५० हजार उत्पन्न नक्कीच मिळू शकते. अभिलेखावरुन गैरअर्जदारावर त्याचे आई–वडीलांची जबाबदारी असल्याचे दिसुन येते. सबब, अर्जदार व गैरअर्जदार यांचा राहणीमानाचा दर्जा, गैरअर्जदाराचे उत्पन्न व त्याचेवर असलेली जबाबदारी इ. सर्व बाबींचा विचार करता गैरअर्जदाराने अर्जदारास दरमहा रु.५,०००/– पोटगी देणे न्यायोचित

ठरेल. म्हणुन, मी मुद्दा क्र.४ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.५ करीता–</u>**

१६. प्रस्तुत प्रकरणात अर्जदारास अंतरिम निर्वाह भत्ता देण्यात आलेला नसल्यामुळे पोटगीची रक्कम अर्ज दाखल केल्याचे तारखेपासुन देणे न्यायोचित होईल. तसेच गैरअर्जदाराचे कृत्यामुळे अर्जदारास प्रस्तुत अर्ज दाखल करावा लागला. सबब, अर्जदार ही गैरअर्जदाराकडुन अर्जाचा खर्च मिळण्यास पात्र ठरते. सबब, मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष लक्षात घेता, मी मुद्दा क्र.५ चे निष्कर्षात पुढील आदेश पारीत करतो;

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराने अर्जदारास दरमहा रु.५,०००/–(अक्षरी रुपये पाच हजार फक्त) पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन द्यावी.

३. गैरअर्जदाराने अर्जदारास अर्जाचा खर्च म्हणुन रु.२,०००/– (अक्षरी रु. दोन हजार फक्त) द्यावे.

४. सदर न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE

**(शहाजी दत्तराव भोसले)**

दि.०४/०४/२०२३

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१, वणी.

मी, अभय प्रमोद भोयर, लघुलेखक (सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), वणी) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.